साप्ताहिक

"एकच ध्येय... एकच आवाज"

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक ३० वा | सोमवार, दि. १०/०८/२०२६ ते दि. १६/०८/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

## स्व. विमलादेवी अग्रवाल धर्मादाय रुग्णालयाचे धुळेकरांच्या साक्षीने लोकार्पण
## पालकमंत्री रावल यांच्या सहकार्यातून धुळ्याच्या विकासाला वेग–आ.अग्रवाल





धुळे – शहरातील जनतेच्या आरोग्यसेवेला स्व. सौ. विमलादेवी ओमप्रकाश अग्रवाल या आधुनिक धर्मादाय रुग्णालयाच्या लोकार्पणातून बळकटी मिळेल. शहर विकासाला वेग देताना चांगली आरोग्य सेवा मिळणेही महत्त्वाचे असते. त्या अनुषंगाने आमदार अनुपभैया अग्रवाल यांच्या पाठपुराव्यातून लोकार्पण होत असलेल्या रुग्णालयासह आणखी चार रुग्णालयांचे काम जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून सुरू आहे. या निधीचा जनकल्याणासाठी असा सदुपयोग होत असल्याने विशेष आनंद आहे. जिल्ह्याचा पालकमंत्री या नात्याने मी हे रुग्णालय जनसेवेत समर्पित करतो, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचारमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले. धुळे महापालिका व एबी फाउंडेशन संचलित स्व. विमलादेवी अग्रवाल धर्मादाय रुग्णालयाचे रविवारी सायंकाळी लोकार्पण झाले, त्यावेळी पालकमंत्री रावल बोलत होते. आमदार अनुपभैया अग्रवाल, आमदार राम भदाणे, भाजपचे ज्येष्ठ नेते ओमप्रकाश अग्रवाल, माजी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्स्ना पाटील, माजी आमदार कुणाल पाटील, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष बापू खलाणे, भाजप बेटी बचाव–बेटी पढावच्या प्रदेश सहसंयोजिका अल्पा अग्रवाल, भाजपच्या गटनेत्या किरण कुलेवार, प्रतोद भगवान गवळी, स्थायी समिती सभापती लताबाई सोनार, महिला व बालकल्याण सभापती उज्ज्वला ठाकरे, उपसभापती शोभा भिल, महापालिकेच्या आरोग्याधिकारी डॉ. संपदा कुलकर्णी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रवी सोनवणे, उद्योजक विनोद मित्तल, ज्येष्ठ नेते भीमसिंह राजपूत, रवींद्र पाठक, विजय पाच्छापूरकर, विनायक शिंदे, डॉ. सुशील महाजन, माजी महापौर चंद्रकांत सोनार, प्रदीप कर्पे, जयश्री अहिरराव, कल्पना महाले, प्रतिभा चौधरी, भाजप महिला जिल्हाध्यक्षा सुवर्णा पाटील, भिकन वराडे, भाजप महानगर जिल्हा सरचिटणीस शशी मोगलाईकर, ओमप्रकाश खंडेलवाल, पवन जाजू आदी प्रमुख पाहुणे होते.

पालकमंत्री रावल म्हणाले, की या रुग्णालयाचे विमलादेवी अग्रवाल असे नामकरण करण्यात आले आहे. विमला काकींनी कुटुंब सांभाळून सामाजिक व राजकीय जीवनात योगदान दिले. त्यांनी भाजपचे प्रदेश कार्यकारिणीचे सदस्यपद भूषविले होते. सलग दहा वर्षे नगरसेविका म्हणूनही कार्य केले. लक्ष्मी महिला सामाजिक, शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून उडाणे (ता. धुळे) येथे आदिवासी आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय सुरू करून गोरगरीब, आदिवासी भागातील मुला–मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. आज विमलाकाकींची जयंती असून, त्यानिमित्त त्यांच्या कार्याचा रुग्णालयाच्या लोकार्पणातून उचित सन्मान होत आहे. रुग्णलयात मेंदूविकार, अस्थिरोग, स्त्रीरोग, किडनी आदी आजारांवर उपचार होतील. एबी फाउंडेशनने रुग्णालयाचे पालकत्व स्वीकारले असून, ते उत्तम संचलन करतील, असा विश्वासही पालकमंत्री रावल यांनी व्यक्त केला. आमदार अग्रवाल म्हणाले, की महापालिकेकडून या जागेवर छोटेसे रुग्णालय बांधण्यात येणार होते. मात्र, प्रभागाच्या नगरसेविका सारिका अग्रवाल व चित्रलेखा परदेशी यांनी आयसीयूसह विविध सुविधांनी सज्ज आधुनिक रुग्णालय उभारण्याची व रुग्णालयाला स्व. सौ. विमलादेवी अग्रवाल यांचे नाव देण्याची सूचना केली. परिसराला लागून महामार्ग जातो. परिसरात गोरगरिबांची वस्ती असून, त्यांना विविध आजारांवरील उपचारांची सुविधा मिळण्यासाठी अत्याधुनिक रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव मी पालकमंत्री रावल यांच्याकडे दिला. त्यांनी तातडीने डीपीडीसीच्या माध्यमातून सुमारे ३५ लाखांचा निधी मंजूर केला. त्यातून आज वातानुकूलित २५ बेडची रुग्णालयाची सुसज्ज इमारत उभी राहिली आहे. रुग्णालयात विविध आजारांवर उपचारांची व शस्त्रक्रियांची सुविधा असेल. शहरात आणखी चार आधुनिक सुविधांनी सुसज्ज रुग्णालयांसाठी पालकमंत्री रावल यांनी १५ कोटींचा निधी मंजूर केला असून, त्यांची कामेही सुरू आहेत. आरोग्य ही ईश्वरी सेवा असून, या रुग्णालयाद्वारे सुरू होत आहे. महापालिकेच्या साक्री रोडवरील संभाजीनगरमधील (मोगलाई) काम सुरू असलेल्या रुग्णालयासाठी पालकमंत्री रावल यांनी २५ कोटींतून सीटी स्कॅन यंत्र मंजूर केले असून, लवकरच ते नाममात्र एक हजार रुपयांच्या शुल्कात सेवेत कार्यरत होईल. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातही नवीन एमआरआय यंत्र उपलब्ध झाले असून, तेही कार्यान्वित होत आहे. रुग्णालयाच्या उभारणीसाठी योगदान देणाऱ्या सर्वांचे आभार मानतो. या सेवेचा रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही आमदार अग्रवाल यांनी केले. एबी फाउंडेशनचे अध्यक्ष कमलेश देवरे यांनी प्रास्ताविकात फाउंडेशनच्या कार्याची माहिती दिली. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांनी सूत्रसंचालन केले. नगरसेविका सारिका अग्रवाल, चित्रलेखा परदेशी, प्रवीण अग्रवाल, विकी परदेशी यांनी संयोजन केले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या नूतनीकरणासाठी १५ सप्टेंबरपर्यंत मुदत

धुळे (जिमाका) – धुळे जिल्ह्यातील सर्व शासनमान्य अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित व्यावसायिक व अव्यावसायिक महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी सन २०२६–२७ या वर्षासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या नूतनीकरण (Renewal) अर्जाची ऑनलाईन प्रक्रिया १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करावी, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे प्रभारी विशेष अधिकारी तथा शासकीय निवासी शाळांचे सहाय्यक आयुक्त योगेश चौधरी यांनी केले आहे. सन २०२६–२७ या वर्षासाठी स्वाधार योजनेचे नूतनीकरण अर्ज विद्यार्थ्यांना https://hmasnew.mahait.org या संकेतस्थळावरील संगणक प्रणालीद्वारे ऑनलाइन भरता येणार आहेत. संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य तसेच पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज विहित मुदतीत भरून आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने सादर करावेत, असेही सूचित करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी नूतनीकरणाची प्रक्रिया अंतिम मुदतीपूर्वी पूर्ण करणे आवश्यक असून, १५ सप्टेंबर २०२६ नंतर अर्जामध्ये कोणताही बदल करता येणार नाही. अर्ज भरताना अथवा सादर करताना तांत्रिक अडचण आल्यास सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधावा. स्वाधार योजनेच्या नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी मुदतीचा लाभ घेऊन अर्ज वेळेत सादर करावेत, असेही आवाहन समाज कल्याण विभागाचे प्रभारी विशेष अधिकारी तथा शासकीय निवासी शाळांचे सहाय्यक आयुक्त योगेश चौधरी आणि सहाय्यक आयुक्त देविदास नांदगावकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

## राष्ट्रीय उपक्रमात सहभागी व्हा–धुळे मनपा

धुळे – स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने हर घर तिरंगा अभियानाअंतर्गत आनंद उत्सवात सर्वांनी आपल्या घरावर तिरंगा ध्वज फडकवून या राष्ट्रीय उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन धुळे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

आपल्या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपुर्वक स्मरण करण्यासाठी हा उपक्रम उत्साहाने साजरा करावयाचा आहे. यापुर्वी हर घर तिरंगा या उपक्रमात धुळेकर नागरीकांनी उत्सुर्तपणे सहभाग नोंदविलेला होता. त्याचपध्दतीने या वर्षीही सदर उपक्रम यशस्वी करावयाचा आहे. शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालय, बँका. शाळा, महाविद्यालय, खाजगी तसेच सहकारी संस्था यांनी आपल्या कार्यालयासमोर तसेच शहरातील प्रत्येक नागरीकांने आपल्या घरासमोर किंवा घराच्या इमारतीवर राष्ट्रध्वजाची उभारणी स्वयंस्फूतीने करावी. हर घर तिरंगा अभियान कालावधीत राष्ट्रध्वज कोणत्याही दिवशी फडकवता येईल. राष्ट्र ध्वज लावताना केशरी रंगाची बाजू काठीच्या वरच्या टोकाकडे असावी, ध्वज उलटा फडकवला जाणार नाही याची काळजी घ्यावी, अर्धा तुटलेला, फाटलेला किंवा मळलेला राष्ट्रध्वज कोणत्याही परिस्थितीत फडकावू नये, राष्ट्रध्वजासमावेत इतर कोणताही ध्वज एकाच काठीवर फडकावू नये, ध्वज उतरविल्यानंतर त्याची व्यवस्थित घडी घालून तो जतन करून ठेवावा. ध्वज संहितेचे पालन करुन राष्ट्रध्वज अभियान कालावधीत घरावर, खाजगी संस्था, शैक्षणिक संस्था ध्वजाची प्रतिष्ठा व सन्मान कायम ठेवत सर्व दिवशी व सर्वप्रसंगी ध्वज फडकवू शकतात.

धुळे महानगरपालिकेमार्फत प्रत्येक प्रभागात ध्वज वितरण नियोजन करण्यात येत आहे. त्यातील सुस्थितीत असलेल्या ध्वजाचा वापर करून या उपक्रमात प्रत्येक नागरीकांनी सहभागी व्हायचे आहे. या राष्ट्रीय उपक्रमात सर्व नागरीकांनी स्वयंस्फूतीने सहभागी होवून हे अभियान यशस्वी करावे असे आवाहान धुळे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

विशेष लेख...



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर (३१ मे, १७२५ – १३ ऑगस्ट, १७९५, राज्यकालावधी इ.स. १७६७ – इ.स. १७९५) या भारतातील, माळव्याच्या तत्त्वज्ञानी महाराणी म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी नर्मदा तीरी, इंदूरच्या दक्षिणेस असलेल्या महेश्वर या ठिकाणी आपली राजधानी हलविली. मल्हाररावांनी त्यांना प्रशासकीय व सैन्याच्या कामात पारंगत केलेल होते. त्या आधाराने अहिल्याबाईंनी इ.स. १७६६ ते इ.स. १७९५ म्हणजे त्यांच्या मृत्यूपर्यंत माळव्यावर राज्य केले होते.

होळकर यांचा जन्म ३१ मे इ.स. १७२५ रोजी महाराष्ट्राच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी (मल्हारपीठ) खेड्यात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसतानाही त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहिण्यावाचण्यास शिकवले होते. मल्हारराव होळकर पुण्यास जाताना चौंडीस थांबले होते. आख्यायिकेनुसार, ८ वर्षाच्या अहिल्यादेवींना, मल्हाररावांनी एका देवळात बघितले. मुलगी आवडल्यामुळे त्यांनी तिला, स्वतःचा मुलगा खंडेराव याची वधू म्हणून आणले.

मल्हारराव होळकरांच्या त्या सून होत. अहिल्यादेवींचे पती खंडेराव होळकर हे इ.स. १७५४ मध्ये कुम्हेरच्या लढाईत धारातीर्थी पडले. त्यांच्या मृत्यूनंतर सासरे मल्हाररावांनी अहिल्याबाईंना सती जाऊ दिले नाही. १२ वर्षांनंतर, मल्हारराव होळकर हेही मृत्यू पावले. त्यानंतर अहिल्याबाई मराठा साम्राज्याच्या माळवा प्रांताचा कारभार बघू लागल्या. त्या लढाईत अहिल्यादेवी स्वतः सैन्याचे नेतृत्व करीत होत्या. पुढे त्यांनी तुकोजीराव होळकर यांची सेनापती म्हणून नेमणूक केली.

इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर, यांना भारताच्या कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मार्गारिट असे म्हणले आहे.१ थोडक्यात अहिल्याबाई यांची तुलना रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गारिट यांच्याशी एकत्रित केली आहे. त्याने म्हणले आहे की ज्या वेळेस जगातील सर्वात महान स्त्रीयांचा इतिहास लिहिला जाईल त्या वेळेस पुण्यशलोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सर्व प्रथम लिहिले जाईल. अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, एवढचं नाही तर त्यानी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरण आखल प्रसिद्ध हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यांत द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक, पुरी जगन्नाथ मंदिर व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महंमदाने ध्वस्त केलेले देऊळ बघून अहिल्यादेवींनी शेजारीच एक शंकराचे एक देऊळ बांधले. सोमनाथला जाणारे लोक या देवळालाही भेट देतात. अहिल्याबाईंना प्रजेस कल्याणकारी असे काम करण्याची आवड होती.

चंबळ पार करून ग्वाल्हेर येथे जावा. तेथे तुम्ही ४–५ दिवस मुकाम करू शकता.तुम्ही मोठे सैन्य ठेवू शकता व त्यांचे शस्त्रांसाठी योग्य तजवीज करा.....कूच करतांना,मार्गावर तुम्ही सुरक्षेसाठी चौक्या लावा.

पूर्वीच शासक म्हणून प्रशिक्षित असल्यामुळे मल्हारराव व खंडेराव यांच्या मृत्यूनंतर अहिल्यादेवींनी स्वतःलाच राज्यकारभार पाहू देण्याची अनुज्ञा मिळण्यासठी पेशव्यांना विनंती केली. त्यांनी शासन करण्यास माळव्यात अनेकांचा विरोध होता, पण होळकरांचे सैन्य अहिल्याबाईंच्या नेतृत्वाखाली काम करण्यास उत्सुक होते. पेशव्यांनी परवानगी दिल्यावर त्यांनी आपल्याला विरोध करणाऱ्यांना चाकरीत घेतले व तुकोजीराव होळकर (मल्हाररावांचा दत्तक पुत्र) यास सेनापतीपद देउन अहिल्यादेवी होळकरांनी माळव्यास प्रयाण केले. अहिल्यादेवींनी पडदा प्रथा कधीच पाळली नाही. त्या रोज जनतेचा दरबार भरवीत असत व लोकांची गाऱ्हाणी ऐकण्यास नेहमीच उपलब्ध असत. जरी राज्याची राजधानी ही नर्मदातीरावर असलेल्या महेश्वर येथे होती तरीही, इंदूर या खेड्याचा विकास करून त्याचे सुंदर मोठ्या शहरात रूपांतर करणे, हे अहिल्यादेवींनी केलेले फार मोठे काम होते. त्यांनी माळव्यात रस्ते व किल्ले बांधले, अनेक उत्सव भरवले, हिंदूमंदिरांमध्ये कायमस्वरूपी पूजा सुरू रहावी म्हणून अनेक दाने दिली. माळव्याबाहेरही त्यांनी मंदिरे, घाट, विहिरी, तलाव व धर्मशाळा बांधल्या.

भारतीय संस्कृती कोशात अहिल्यादेवी होळकरांनी केलेल्या बांधकामांची यादी आहे – काशी, गया, सोमनाथ,अयोध्या, मथुरा, हरिद्वार, कांची, अवंती, द्वारका, बद्रीकेदार, रामेश्वर व जगन्नाथपुरी वगैरे. अहिल्यादेवींस, सावकार, व्यापारी, शेतकरी इत्यादी आर्थिकदृष्ट्या सुदृढ झालेले बघून आनंद होत असे. परंतु त्यांनी त्यांच्यावर आपला अधिकार असल्याचे कधीच जाणवू दिले नाही. त्यांनी सर्व राज्यकारभार हा सुखी व धनाढ्य लोकांकडून नियमांतर्गत मिळालेल्या धनापासून चालविला होता, असे दिसते.

अहिल्यादेवींनी जनतेच्या/ रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. अहिल्यादेवींच्या राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक घेऊ शकत असे. एकदा त्यांच्या एका मंत्र्याने लाच घेतल्याशिवाय दत्तक घेण्याच्या मंजुरीस नकार दिला, तेव्हा अहिल्यादेवींनी दत्तकविधानाचा कार्यक्रम स्वतः प्रायोजित करून, रीतसर कपडे व दागिन्यांचा आहेर दिला. अहिल्यादेवी होळकरांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून, सन १९९६ मध्ये, इंदुरातील नागरिकांनी त्यांच्या नावाने एक पुरस्कार सुरू केला. तो, दरवर्षी, जनसेवेचे विशेष काम करणाऱ्यास दिला जातो. भारताच्या पंतप्रधानांनी पहिल्या वर्षी तो पुरस्कार नानाजी देशमुखांना दिला.

अहिल्याबाई होळकर यांच्या स्मरणार्थ, इंदूर येथील विश्वविद्यालयास त्यांचे नाव दिले आहे. तसेच त्यांचे नावाचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ हे एक विद्यापीठ सोलापूरला आहे.

भिल्ल व गोंड या राज्याच्या सीमेवर असलेल्या जमातींमधील वाद अहिल्यादेवी सोडवू शकल्या नाहीत. तरीही, त्यांनी त्या लोकांना पहाडातील निरुपयोगी जमीन दिली आणि त्यांना, त्या क्षेत्रातून जाणाऱ्या सामानावर थोडा 'कर' घेण्याचा अधिकार दिला. यासाठी रायगंण सुभ्यावर नवापुर या ठिकाणी ठिंगळे भिल्ल सरदार यांना अधिकार दिले त्यामुळे भिल्ल जमाती होळकराच्या सैन्यात आले व त्यांनी सुरते वर वचक बसवला. याही बाबतीत, (आंग्ल लेखक) 'माल्कम' यांच्यानुसार, अहिल्यादेवींनी' त्यांच्या सवयींवर लक्ष ठेवले'.

महेश्वर येथील अहिल्यादेवींची राजधानी ही जणू काव्य, संगीत, कला व उद्योग यांची संस्थाच होती. महाराष्ट्रातील प्रसिद्ध मराठी कवी मोरोपंत व शाहीर अनंतफंदी यांना व संस्कृत विद्वान खुशालीराम यांना अहिल्याबाईंनी आश्रय दिला. कारागरांना, मूर्तिकारांना व कलाकारांना त्यांच्या राजधानीत सन्मान व वेतन मिळत असे. त्यांनी महेश्वर शहरात एक कपड्याची गिरणीपण सुरू केली.

एकोणीसाव्या व विसाव्या शतकातील भारतीय, इंग्रजी व अमेरिकन इतिहासकार हे मान्य करतात की, अहिल्यादेवी होळकरांस माळवा व महाराष्ट्रात, त्या काळी व आताही, संताचा सन्मान दिला जातो. इतिहासाच्या कोणाही अभ्यासकास ते मत खोडून काढण्याजोगे आजवर काहीही सापडलेले नाही. राजकारणातील बारकावे व तत्त्व व्यावहारिक नीती नियम व सूत्रे आपल्या देशाची राजकीय, सामाजिक, भौगोलिक स्थिती, रणांगणावरील आखाडे व अडचणी आणि बारकावे समजून घेतले. मल्हारराव यांच्या गैरहजेरीत सर्व कारभार करण्यात त्या पारंगत झाल्या.

ज्या काळी दळणवळणाची साधने फारच कमी होती किवा म्हटले तर नव्हती अशी परस्थिती होती अश्या खडतर काळात त्यांनी भारतातील तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी व राज्यात मंदिरे धर्मशाळा तलाव, विहिरी, पाणपोई, घाट अशी अनेक समाज उपयोगी कामे केली. आज ही वास्तुशिल्पे व त्यांनी उभारलेली स्थापत्य कला मातोश्रीच्या भव्य कार्याची साक्ष देत उभी आहेत. वास्तुशिल्प व बांधकाम केल्यामुळे कारागिरांची कला जोपासून संकृतीचा वारसा तर जपलाच पण त्याच बरोबर गोरगरीब जनतेच्या हाताला काम मिळवून दिले. त्यांच्या कामगिरीचा हा दुहेरी बाणा निश्चीतच अभिमानास्पद आहे. ज्या प्रमाणे आहिल्यादेवी लोककल्यान आणि समाज सुधारना करीत त्याच प्रमाने लोकांमधे समानता अनन्याच काम करीत आहिल्यादेवी नी आपल्या सेन्या मध्ये पुरुषा ना संधी देत त्याच प्रमाने महिला नाही संधी मिळत आणि म्हणुनच आहिल्यादेवी नी सेन्या मध्ये महिला ची ही एक मोठी तुकडी खास सामावुन घेतली आणि म्हणुनच आहिल्यादेवी ना समान न्याय करनार्या न्यायदेवता म्हनुन आहिल्यादेवी ना ओळखल जातं.

मातोश्रीची लोककल्याणाची कीर्ती ख्याती ऐकुन अनेक विद्वन लोक त्यांची भेट घेण्यास येत असत आणि नंतर त्या ठिकाणीच राहत असत. अनेक विषयाचे विद्वान, शास्त्री पंडीत, व्याकरणकार, कीर्तनकार, ज्योतिषी, पुजारी, वैद्य, हकीम यानाही त्या मुद्दाम बोलावून घेऊन त्यांना त्या राजाश्रय देत असत. महेश्वर नगरीत वास्तव करीत होते म्हणूनच महेश्वर नगरी त्याकाळी संस्कृती विद्वान व धर्माचे माहेरघर म्हणून नावारूपाला आली होती . ग्रंथ संपंदा– निर्मिती छापखाने नसल्याने त्या काळी धर्माचे तत्त्वज्ञान जाणून घेण्याकरिता हस्तलिखिते यावरच अवलंबून राहावे लागत होते. हस्तलिखिते लिहिणारे मोठ्या प्रमाणात रकमेची मागणी करत असत. ज्या प्रमाणे हिरा व रत्ने पारखणाऱ्या जवाहिऱ्याप्रमाणे त्या विद्द्येची महत्त्व जाणत असल्याने त्याच्या मागणीप्रमाणे रक्कम देऊन ग्रंथाची हस्तलिखिते तयार करून विद्वान विद्यार्थ्यांसाठी अनमोल ग्रंथसंपदा निर्माण करून जतन केली. शाळा काढून विद्याप्रसाराचे काम केले.

या काळात सती जाण्याची मोठी रूढी व परंपरा होती. सती गेल्याने पुण्य व न गेल्याने पाप असा समज समाजात रूढ होता. रामायण आणि महाभारत यामध्ये अनेक युद्ध होऊनही कोणी सती गेल्याचा उल्लेख नाहीत असे अनेक दाखले देऊन सती प्रथेला शास्त्राचा आधार नाही हे प्रजेला पटवून दिले. कालांतराने १८२९ साली राजाराम मोहन रॉय यांचा प्रयत्नामुळे सतीची अनिष्ट चाल कायद्याने बंद करण्यात आली यावरून अहिल्याबाई होळकर यांच्या दूरदृष्टतेची प्रचीती आपणास यते. त्या काळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना व प्रजेची चोर दरोडेखोर व भिल्ल लुटमार करीत असत अशा लुटारू लोकांना ठिंगळे सरदारांमार्फत सैन्यात सामील करून पाळीव पशु व गायी, म्हशी आणि शेत जमीनी दिल्या व त्यांचे मत परिवर्तन केले व ते लोक शेती करू लागले त्यामुळे त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटला. भिल्ल लोकांना भिलकवाडी कर घेण्याची परवानगी दिली. एवढे करूनही प्रजेला त्रस्त करणाऱ्या या लोकांना त्यांनी तोफेच्या तोंडी देऊन एक प्रकारचा दरारा नर्माण केला.

अहिल्याबाई होळकर यांच्या न्यायप्रियतेची ख्याती सर्व दूर पसरली होती. सर्वांना समान न्याय हा त्यांचा बाणा होता. त्यांच्या संस्थानचा सुभेदार तुकोजी होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला म्हणून त्याला तुरुंगात डांबले. तर अहिल्यादेवी च्या सर्वांना समान न्याय या विचाराने डॉ .बाबासाहेब आंबेडकर हे सुद्धा प्रभावित होते. महेश्वर येथे संस्कृत पाठशाळा सुरू केली. अन्नछत्रे घातली. अनेक ठिकाणी मंदिरे बांधली. गुजराथेतील सोरटी सोमनाथाच्या मंदिराचा जिर्णोद्धार केला. असे पुण्यसंचयाचे काम अहिल्यादेवी करीत होत्या. तशातच त्यांचा नातू तेराव्या वर्षी मरण पावला. काही दिवसातच जावई लढाईत कामी आला आणि मुलगीही सती गेली. आयुष्यभर कोसळलेल्या संकटांनी त्यांचा अंत पाहिला होता. त्यांची प्रकृती बिघडत गेली आणि अखेर १३ ऑगस्ट १७९५ रोजी त्यांनी शांतपणे मृत्यूला जवळ केले.

## १३६ इन्फंट्री बटालियन मध्ये महिलासाठी भरतीचे आयोजन

धुळे (जिमाका) – १३६ इन्फंट्री बटालियन (प्रादेशिक सेना) मध्ये भूतपूर्व महिलासाठी कोल्हापूर–१०९ इन्फंट्री बटालियन अंतर्गत १३६ इन्फंट्री बटालियन (टीए) मराठा एलआई मार्फत १ सप्टेंबर ते ४ सप्टेंबर, २०२६ पहिला टप्पा कोल्हापूर–१०९ इन्फंट्री बटालियन मराठा, कोल्हापूर येथे सकाळी ५ वाजता तसेच दुसरा टप्पा ८ सप्टेंबर ते ११ सप्टेंबर, २०२६ या कालावधीत सैन्य भरती कार्यालय, छत्रपती संभाजी नगर येथे सकाळी ५ वाजता सैन्यभरती आयोजित केली आहे. सर्व पात्र उमेदवारांनी उपरोक्त कालावधीत शारीरिक चाचणीसाठी उपस्थित राहावे. महाराष्ट्र राज्यातील उमेदवारासाठी, जेसीओ–४ पदे, सैनिक (जीडी) १६२ महाराष्ट्र राज्यासाठी ट्रेड्समन– १५ पदे, हेअर ड्रेसर १, मेस किपर १,स्वीवर्ड १, हाऊस किपर १, शेफ कम्युनिटी २,बाराश्मेन २, उमेदवारासाठी ही भरती होणार आहे. भरतीसाठी भूतपूर्व सैनिक (निवृत्तीवेतनधारक) सशस्त्र बल से किंवा वने व हवामान बदल मंत्रालय (चेएऋउउ) आणि राज्य वन विभागात किमान २० वर्षे सेवा केलेले भूतपूर्व महिला कर्मचारी असावेत. अधिक माहितीसाठी ९१६८१६८१३६ वर संपर्क साधावा,असे एका प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

# ना. जयकुमार रावल यांच्याकडून पूरग्रस्त भागाची पाहणी





## नियमानुसार सर्वतोपरी मदत करणार

धुळे (जिमाका) – धुळे तालुक्यातील अंबोडे, मुकटी, अंचाडे या पूरग्रस्त गावांना राज्याचे पणन, राजशिष्टाचार तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी आज दुपारी भेट देऊन पाहणी करीत पूरग्रस्तांशी संवाद साधला. शासन नियमानुसार तातडीने सर्वतोपरी मदत करावी, अंबोडे येथे नदी पात्रालगत असलेल्या शाळेच्या स्थलांतरासाठी जिल्हा परिषदेने नवीन जागेचा शोध घ्यावा, असे निर्देश त्यांनी दिले. धुळे तालुक्यात मागील आठवड्यात अतिवृष्टी झाली. त्यात अंबोडे, मुकटी, अंचाडे परिसरात पुरामुळे नुकसान झाले. अंबोडे येथील दोन जण पुरात वाहून गेले. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री श्री. रावल यांनी भेट दिली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार,

अपर जिल्हाधिकारी संदीप पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सूरज जगताप, उपविभागीय अधिकारी रोहन कुवर, जिल्हा परिषदेच्या कृषी अधिकारी कावेरी राजपूत, तहसीलदार अरुण शेवाळे, तालुका कृषी अधिकारी माधुरी गायकवाड, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, दोंडाईचा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष मनोहर भदाणे, धरती देवरे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले की, पुरात वाहून गेलेल्या व्यक्तींचा राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे पथक शोध घेत आहे. राज्य सरकारतर्फे नियमानुसार नुकसान भरपाई देण्यात येईल. पावसामुळे ज्या कुटुंबाच्या घरांचे नुकसान झाले आहे, अशा कुटुंबांना घरकुल योजनेतून प्राधान्याने घरे द्यावीत. तसेच महसूल व कृषी विभागाने पूरामुळे नुकसान झालेल्या शेती, घरे व इतर मालमत्तेच्या पंचनामे तात्काळ पूर्ण करावेत. प्रत्येक गावात विशेष ग्रामसभा आयोजित करून नुकसानग्रस्त ग्रामस्थांची यादी वाचून दाखवावी. पूरामुळे वाहून गेलेले रस्ते, पूल आणि बंधाऱ्यांची तातडीने दुरुस्ती करून वाहतूक सुरळीत करावी. तसेच भविष्यात अशा प्रकारची परिस्थिती टाळण्यासाठी संबंधित ठिकाणी मोठ्या उंचीचे पूल, नवीन रस्ते व बंधाऱ्यांचे प्रस्ताव तातडीने तयार करून शासनाकडे सादर करावेत, अशा सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. नदीकाठावरील धोकादायक भागात राहणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षित पुनर्वसनासाठी ग्रामस्थांशी संवाद साधून अन्य सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याबाबत नियोजन करावे, असे निर्देशही पालकमंत्री श्री. रावल यांनी दिले.

# १२ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

धुळे (जिमाका) – महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशाप्रमाणे शनिवार, १२ सप्टेंबर, २०२६ रोजी संपुर्ण धुळे जिल्हयातील न्यायालयामध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर होणाऱ्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि या लोक अदालतीचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा. असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्षा, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धुळे एस. एस. भीष्म, यांनी केले आहे. लोकन्यायालयामध्ये न्यायालयात प्रलंबित असलेली भूसंपादन प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे, १३८ धनादेश अनादरीत झाल्याची प्रकरणे, दिवाणी अपिल, तडजोडपात्र प्रकरणे, महानगरपालिका, ग्रामपंचायत यांच्या घरपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, दूर संचार निगम लिमिटेड, विजवितरण, राष्ट्रीयकृत बँक आणि पतसंस्था व इतर यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

लोकअदालतमध्ये तडजोडीसाठी प्रकरण ठेवण्याची प्रक्रिया ही अत्यंत सुलभ व पक्षकारांच्या हिताची आहे. ज्या न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे त्या न्यायालयात अर्ज दिल्यास दोन्ही पक्षाच्या सहमतीने लोकअदालतमध्ये तडजोडीसाठी प्रकरण ठेवता येते. तसेच लोकअदालतीमध्ये जर प्रकरणामध्ये सामोपचाराने तडजोड झाली नाही तर ते प्रकरण नियमित न्यायालयाकडे चालविता येते. राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये प्रकरणे तडजोडीने निकाली केल्यास लोकांचा पैसा आणि वेळ यांची बचत होते व पक्षकारांना तात्काळ न्याय मिळतो त्याचप्रमाणे न्यायालयात भरलेले कोर्ट फि सुध्दा नियमानुसार परत मिळते. शनिवार १२ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता राष्ट्रीय लोकअदालतीचे धुळे जिल्हा न्यायालयात आयोजन करण्यात आले असुन जास्तीत जास्त पक्षकारांनी याचा लाभ घ्यावा. असेही आवाहन सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव प्रविण कुलकर्णी यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

# धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र राज्य प्रवासी वाहतूक चालक कल्याणकारी मंडळासाठी सभासद नोंदणीचे आवाहन

धुळे (जिमाका) – धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र राज्य प्रवासी वाहतूक चालक कल्याणकारी मंडळाच्या सदस्यत्वासाठी जिल्ह्यातील सर्व प्रवासी वाहतूक करणाऱ्या परवानाधारक वाहनचालकांनी ऑनलाइन नोंदणी करून शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी अशोक पवार यांनी केले आहे. १६ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र राज्य ऑटो रिक्षा व मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली होती. सुरुवातीला ही योजना ऑटो रिक्षा व मिटर्ड टॅक्सी चालकांसाठी लागू होती. मात्र, शासनाने योजनेत सुधारणा करून मंडळाचे नाव 'धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र राज्य प्रवासी वाहतूक चालक कल्याणकारी मंडळ' असे केले असून योजनेचा विस्तार सर्व प्रवासी वाहतूक वाहन चालकांसाठी करण्यात आला आहे.

या सुधारित योजनेअंतर्गत ऑटो रिक्षा, मीटर टॅक्सी, चालकांसह टॅक्सी कॅब, प-आधारित ओला-उबर सेवा, पर्यटक वाहने तसेच इतर प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांचे चालक मंडळाचे सदस्य होण्यासाठी पात्र ठरणार आहेत. मंडळामार्फत विविध कल्याणकारी योजनांचा लाभ पात्र चालकांना होणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत प्रवासी वाहतूक परवानाधारक चालकांनी मंडळाच्या सदस्यत्वासाठी ऑनलाइन नोंदणी करावी. यासाठी अधिकृत संकेतस्थळ https://ananddighekalyankarimandal.org वरती ऑनलाइन अर्ज सादर करून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असेही आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. पवार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत शासकीय वसतीगृह प्रवेश प्रक्रिया सुरू; ३१ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन अर्जाचे आवाहन

धुळे (जिमाका) – इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी शासकीय वसतीगृह प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, बारावीनंतर व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमांचे उच्च शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी ३१ ऑगस्ट, २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सहायक संचालकांनी केले आहे. जिल्हास्तरावरील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती-भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, अनाथ, दिव्यांग तसेच आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी शासनाने निश्चित केलेल्या आरक्षणानुसार शासकीय वसतीगृहात प्रवेश देण्यात येणार आहे. बारावीनंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या सुविधेचा लाभ घेता येईल. प्रवेश प्रक्रियेनुसार विद्यार्थ्यांना ३१ ऑगस्ट, २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करता येतील. अर्जांची छाननी १ ते ७ सप्टेंबर, २०२६ या कालावधीत करण्यात येणार आहे. गुणवत्तेनुसार पहिली निवड यादी ८ सप्टेंबर, २०२६ रोजी प्रसिद्ध होईल. पहिल्या निवड यादीतील विद्यार्थ्यांना १८ सप्टेंबर, २०२६ पर्यंत प्रवेश निश्चित करता येईल. त्यानंतर दुसरी प्रतीक्षा यादी २१ सप्टेंबर, २०२६ रोजी जाहीर करण्यात येईल. या यादीतील विद्यार्थ्यांना ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत अंतिम प्रवेश दिला जाईल. वसतीगृह प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी ७ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट, २०२६ या कालावधीत http://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावेत. धुळे येथे इतर मागास बहुजन कल्याण विभागाची दोन शासकीय वसतीगृहे कार्यरत आहेत. मुलांसाठी देवपूर येथील इतर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह असून त्याची क्षमता ७० आहे. प्रवर्गनिहाय आरक्षणासाठी १००, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी ७ तर अव्यावसायिक अभ्यासक्रमासाठी १२ जागा रिक्त आहेत. तसेच मुलींसाठी देवपूर येथील इतर मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहाची क्षमता ५० असून प्रवर्गनिहाय आरक्षणासाठी १००, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी ११ व अव्यावसायिक अभ्यासक्रमासाठी १० जागा उपलब्ध आहेत. पात्र विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन विहित मुदतीत अर्ज सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाने केले आहे.

# धुळे शहरातील महत्त्वपूर्ण बैठकीत पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा निर्धार






धुळे – धुळे शहरातील ङखठ अभियानाच्या प्रगतीचा आढावा तसेच दि. १४ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात येणाऱ्या भव्य तिरंगा रॅलीच्या नियोजनासाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने आज महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत ङखठ अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी आवश्यक नियोजन, कार्यकर्त्यांच्या जबाबदाऱ्या तसेच तिरंगा रॅली यशस्वी व भव्य करण्यासाठी सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत SIR अभियानातील प्रगती, बूथनिहाय नियोजन, कार्यकर्त्यांमध्ये समन्वय आणि अभियानाची प्रभावी अंमलबजावणी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच ७० % च्या वरती ज्या बूथचे काम झाले आहे. अशा सर्व बूथ च्या BLA 2 यांचे अभिनंदन करण्यात आले. व ज्या बूथचे ६० % पेक्षा कमी काम झाले आहे अशा बूथ च्या इङ– २ यांना आपले काम वेगाने करावे असे आवाहन करण्यात आले. एकंदरीत ङखठ संदर्भात धुळे शहराचा आढावा घेत असतांना प्रभारी डॉ. सौ. भारतीताई पवार यांनी समाधान व्यक्त केले. तसेच दि. १४ ऑगस्टच्या तिरंगा रॅलीमध्ये धुळे शहरातून मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते व राष्ट्रप्रेमी नागरिक सहभागी व्हावेत, यासाठी आवश्यक नियोजन करण्याचा निर्धार करण्यात आला. या प्रसंगी उपस्थित सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी छत्रपती संभाजी नगर येथील १४ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या भव्य तिरंगा रॅलीसाठी धुळे शहरातुन मोठ्या संख्येने प्रयान करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

या बैठकीस माजी केंद्रीय मंत्री डॉ. भारती ताई पवार, माजी केंद्रीय मंत्री डॉ. सुभाष बाबा भामरे, धुळे शहर आमदार मा. अनुप भैया अग्रवाल, महापौर मा. मायादेवी परदेशी, उपमहापौर मा. ज्योत्स्ना पाटील, भाजपा महानगर सरचिटणीस मा. ओम भैया खंडेलवाल, ज्येष्ठ नेते मा. विजुनाना पाच्छापुरकर, माजी महापौर मा. जयश्रीताई अहिरराव, SIR Ywio eha BLA 1 नगरसेवक रोहित चांदोडे, माजी महापौर मा. कल्पनाकाकू महाले, महिला मोर्चा अध्यक्ष मा. सुवर्णाताई पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष मा. आकाश परदेशी, माजी महामंत्री डॉ. सुशीलकुमार महाजन, प्रतोद मा. भगवान आप्पा गवळी, सरचिटणीस मा. शशीभाऊ मोगलाइकर, सरचिटणीस मा. पवन जाजू, सरचिटणीस मा. सुनील कपिल, उपाध्यक्ष मा. श्यामसुंदर पाटील मंडल अध्यक्ष प्रथमेश गांधी, पंकज धात्रक, अमोल मासुळे, ज्ञानेश्वर पाटील, इङ– २ यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ङखठ अभियान अधिक प्रभावीपणे राबवून ते यशस्वी करण्याचा तसेच १४ ऑगस्टची तिरंगा रॅली भव्य, शिस्तबद्ध आणि ऐतिहासिक करण्याचा निर्धार व्यक्त केला. राष्ट्रध्वजाचा सन्मान, राष्ट्रप्रेमाची भावना आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविण्यासाठी तिरंगा रॅली महत्त्वपूर्ण ठरणार असून, या रॅलीत धुळे शहरातून मोठ्या संख्येने सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच धुळे शहरात प्रत्येक घरावर तिरंगा ध्वज लावण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. एक तिरंगा, एक संकल्प, एक भारत! या राष्ट्रभावनेने प्रेरित होऊन ङखठ अभियानाच्या यशासाठी आणि तिरंगा रॅलीच्या ऐतिहासिक यशासाठी भाजपा धुळे महानगर सज्ज झाले आहे.

# एच.आर. पटेल कन्या प्राथमिक शाळेत क्रांती दिन मोठ्या उत्साहात साजरा



शिरपूर - शहरातील एच. आर. पटेल कन्या प्राथमिक शाळेत क्रांती दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. क्रांती दिनाचे औचित्य साधून भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढा देणाऱ्या महान क्रांतिकारकांना मुख्याध्यापक विवेकानंद ठाकरे व शिक्षक बंधू–भगिनी यांनी क्रांतिकारकांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. महान क्रांतिकारकांनी आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी काय अथक प्रयत्न केले व कसे बलिदान दिले याची माहिती विद्यार्थिनींना दिली.

क्रांती दिनाचे औचित्य साधून शाळेत शनिवार कृती उपक्रमांतर्गत गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम गीत गायन स्पर्धेत सहभागी ९४ विद्यार्थिनींची वर्गनिहाय स्पर्धा घेण्यात आली व त्या स्पर्धेतून प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थिनींची अंतिम स्पर्धा घेण्यात आली. प्रत्येक वर्गातून निवडलेल्या विद्यार्थिनींमध्ये इयत्ता पहिलीतील हितांक्षी प्रवीण धनगर व तनुश्री जगदीश माळी, इयत्ता दुसरीतील जान्हवी योगेश पाटील व धनश्री नितीन पाटील, इयत्ता तिसरीतील नव्या हेमंत चौधरी व कुमुदिनी राहुल सनेर तर इयत्ता चौथी मधून दिव्यांनी रवींद्र धनगर व अनन्या संजय मेटकर यांची निवड करण्यात आली होती. विद्यार्थिनींनी अतिशय सुंदर आवाजात देशभक्तीपर गीत सादर केले. त्याचप्रमाणे बालवाडी पहिली व दुसरीच्या विद्यार्थिनींसाठी वेशभूषा स्पर्धेचे देखील आयोजन करण्यात आलेले होते. या स्पर्धेसाठी २०० विद्यार्थिनींनी विविध व्यक्तिमत्त्वांची वेशभूषा साकारली होती. त्यात सावित्रीबाई फुले, झाशीची राणी लक्ष्मीबाई, जिजामाता, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुभाषचंद्र बोस अश्या अनेक महान व्यक्तींचा समावेश होता. मुख्याध्यापकांनी विद्यार्थिनींचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी गीत गायन स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थिनीला बक्षीस देण्याचे जाहीर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश राजपूत यांनी केले. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## शासनाच्या विशेष मोहिमेअंतर्गत शाळांमध्ये अनिवार्य बायोमेट्रिक अपडेट शिबिरांचे उद्घाटन संपन्न

धुळे (जिमाका) –महाराष्ट्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या अनिवार्य बायोमेट्रिक अपडेट (Mandatory Biometric Updation - MBU) विशेष मोहिमेचा शुभारंभ नोडल अधिकारी (आधार) तथा निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले. आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या दि. १७ जुलै २०२६ रोजीच्या निर्देशानुसार शाळांमधील प्रलंबित अनिवार्य बायोमेट्रिक अपडेट पूर्ण करण्यासाठी या विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व शाळांमधील ५ ते १५ वर्षे वयोगटातील प्रलंबित विद्यार्थ्यांचे Mandatory Biometric Updation (MBU-1) करण्यात येणार आहे. तसेच १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर अद्याप बायोमेट्रिक अपडेट न केलेल्या विद्यार्थ्यांचे Mandatory Biometric Updation (MBU-2) देखील या शिबिरांद्वारे करण्यात येणार आहे. सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व पालकांनी विशेष चइण अभियानादरम्यान शाळेत येणाऱ्या आधार केंद्रचालकांच्या माध्यमातून प्रलंबित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे बायोमेट्रिक अपडेट करून घ्यावे. तसेच पालकांनी शाळा प्रशासन व आधार केंद्रचालकांना आवश्यक सहकार्य करून ही मोहीम यशस्वी करावी. असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा नोडल अधिकारी (आधार) शरद पवार यांनी यावेळी केले.

## निमझरी येथील आर.सी.पटेल आश्रमशाळेत जागतिक आदिवासी दिन व क्रांती दिन उत्साहात साजरा

शिरपूर - तालुक्यातील निमझरी येथील आर.सी.पटेल अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत जागतिक आदिवासी दिन तसेच क्रांती दिन मोठ्या उत्साहात आणि विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी आदिवासी समाजाचे दैवत धरती आबा भगवान बिरसा मुंडा, भगवान वीर एकलव्य, क्रांतिवीर खाज्या नाईक, तंट्या भिल तसेच इतर महान आदिवासी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून पूजन व अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक जी.एम.पाटील होते. माध्यमिक विभागाचे प्राचार्य पी. पी. चव्हाण उपस्थित होते. यावेळी उच्च माध्यमिक शिक्षक ए.पी.माळी व प्राथमिक शिक्षक जी.डी.लांबर्डे यांनी जागतिक आदिवासी दिनाचे महत्त्व, आदिवासी समाजाची समृद्ध संस्कृती, परंपरा, संघर्ष आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आदिवासी क्रांतिकारकांचे योगदान याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

जागतिक आदिवासी दिन व क्रांती दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी दोन गटांमध्ये निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या लेखनातून आदिवासी समाजाची संस्कृती, परंपरा, जीवनपद्धती, स्वातंत्र्यलढा तसेच आदिवासी महापुरुषांच्या कार्याविषयीची भावना प्रभावीपणे व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जगदीश धनगर व योगिता तायडे यांनी केले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी वंदे मातरमचे गायन करण्यात आले. तसेच 'जय आदिवासी, जय जोहार' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अधीक्षक, अधिक्षिका, सर्व शिक्षक बंधू–भगिनी, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले. आदिवासी संस्कृती, शौर्य आणि स्वाभिमानाची जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात रुजविणारा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात व मिष्टान्न भोजन सह संपन्न झाला.

हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय – घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे – ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर –
भ्रमणध्वनी – ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार – ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखानाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)